# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.03.2024** **वारःरविवार**

1. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील पाच जागांसाठी 97 उमेदवार
2. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शी होण्यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध उपक्रम
3. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर उद्यापासून 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम
4. रंगपंचमीचा सण राज्यात उत्साहात साजरा आणि
5. राज्यात काही ठिकाणी उन्हाची काहिली तर अनेक ठिकाणी पाऊस, विदर्भासाठी आजही इशारा

**महाराष्ट्र लोकसभा**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील पाच जागांसाठी 97 उमेदवार रिंगणात आहेत. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काल हे चित्र स्पष्ट झालं. नागपुर, चंद्रपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या पाच मतदारसंघात 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या जागांसाठी अनोंदणीकृत पक्षांचे तेरा तर 12 अपक्ष उमेदवार आहेत. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं की पहिल्या टप्प्यात 95 लाख 54 हजारांहून अधिक पात्र मतदार असून त्यामध्ये 48 लाखांहून अधिक पुरुष आणि 47 लाखांहून अधिक महिला मतदार तर 347 तृतीयपंथी मतदार आहेत. दहा हजार 652 मतदान केंद्रं असतील. निवडणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी 1 हजार 656 भरारी पथकं आणि 2 हजार 96 स्थितीज सर्वेक्षण पथकं कार्यरत आहेत असं चोकलिंगम म्हणाले.

**राष्ट्रवादी काँग्रेस-मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं लोकसभा निवडणुकांसाठी पाच उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळे, शिरूर लोकसभा मतदारसंघातून अमोल कोल्हे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. याशिवाय, अहमदनगरमधून निलेश लंके, वर्धा इथून अमर काळे आणि दिंडोरी मतदारसंघातून भास्कर भगरे यांना उमेदवारी देण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काल माध्यमांशी बोलताना केली. महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असून उर्वरित उमेदवारांची घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याचंही पाटील यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून परभणी मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाला जागा देण्यात येणार असून महादेव जानकर हे उमेदवार असतील अशी माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. बारामती जागेसाठी सुनेत्रा पवार यांची उमेदवारी त्यांनी यावेळी जाहीर केली.

**पुणे-जिल्हाधिकारी**

मतदार यादी विशेष पुर्नरिक्षण कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्हा निवडणूक प्रशासनानं मतदार यादी शुद्धीकरणासाठी विशेष प्रयत्न केले असल्यानं मतदार यादीत कोणतेही दोष नाहीत. काही ठिकाणी आढळलेल्या तांत्रिक त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचं स्पष्टीकरण पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी काल दिलं. मतदार यादीत काही त्रुटी असल्याच्या तक्रारी आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी हे स्पष्टीकरण दिलं आहे.

**निवडणूक आयोग-यवतमाळ**

अकोला इथले निवडणूक खर्च निरीक्षक बी. ज्योतिकिरण यांनी तर वाशिम लोकसभा निवडणूक खर्च निरिक्षक प्रमोद वर्मा यांनीही निवडणूक खर्चविषयक बाबींचा काल आढावा घेतला.

**मतदान केंद्र-नाशिक**

पंधराशेपेक्षा जास्त मतदार असलेल्या मतदान केंद्राच्या ठिकाणी अतिरिक्त सहाय्यक मतदान केंद्र तयार करण्यास निवडणूक आयोगानं नाशिक जिल्हा प्रशासनाला मान्यता दिली आहे. त्यामुळे नाशिकमध्ये आता नव्यानं 61 मतदान केंद्र उभारली जाणार आहेत. लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील मतदान केंद्रांची संख्या आता 4 हजार 739 वरून 4 हजार 800 पर्यंत असेल.

**मतदान जागृती-यवतमाळ**

यवतमाळ मध्ये 'मतदान आपला अधिकार आणि कर्तव्यसुद्धा' असा संदेश देत हजारो विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून भारताचा नकाशा साकारला. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे म्हणून 'वोट' असा मजकूर आणि मतदान चिन्हाची प्रतिकृती साकारण्यात आली होती.

**मस्ट-उद्घोषणा**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम आकाशवाणीवरुन उद्या सोमवार 1 एप्रिलपासून सादर केला जाणार आहे. संध्याकाळी सव्वा 7 ते साडे 7 वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्त विभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युब चॅनलवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

**जगद्गुरू आदिशंकराचार्य-रत्नागिरी**

जगद्गुरू आदिशंकराचार्यांच्या विचारांवर आधारित असलेलं एका दिवसाचं चर्चासत्र रत्नागिरीत शुक्रवारी आयोजित करण्यात आलं होतं. त्या चर्चासत्राविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे रत्नागिरीचे प्रतिनिधी...

**नागपूरच्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचं रत्नागिरीतलं भारतरत्न डॉक्टर पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन उपकेंद्र आणि गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाचा संस्कृत विभाग यांच्या सहयोगाने जगद्गुरू आदिशंकराचार्यांच्या विचारांवरचं चर्चासत्र रत्नागिरीत पार पडलं. नवी दिल्लीतल्या भारतीय भाषा समितीच्या आर्थिक साह्याने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आलं होतं. एकात्मता बळकट होऊन देश महान होण्यासाठी, तसंच 'वसुधैव कुटुम्बकम्' ही भावना दृढ होण्यासाठी आजच्या काळात आदिशंकराचार्यांच्या विचारांची आणि कर्तृत्वाची गरज आहे. त्या दृष्टीने युवा पिढीची जागरूकता हा चर्चासत्राचा उद्देश असल्याचं संस्कृत विद्यापीठाचे कुलसचिव प्राध्यापक कृष्णकुमार पांडेय यांनी सांगितलं. आदिशंकराचार्यांनी भारताच्या भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातली आणि परंपरेची एकात्मता दृढ केली. त्यांनी परिक्रमेतून भारताच्या कानाकोपऱ्यात चैतन्य निर्माण केलं. देशाच्या चार दिशांना स्थापन केलेली चार पीठं, त्यांना देण्यात आलेले वेद आणि त्यांची केलेली सूत्रबद्ध योजना या बाबी त्यांची दूरदृष्टी दर्शवतात, असं प्राध्यापक पांडेय म्हणाले. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**रंगपंचमीचा-तुळजापूर, सोलापूर, नाशिक, अहमदनगर**

रंगपंचमीचा सण नाशिकमध्ये काल उत्साहानं पार पडला. श्री काळाराम मंदिरात यावर्षीचे उत्सवांचे मानकरी राघवेंद्र पुजारी यांनी केशर पळसाच्या पानांच्या रंगाची अबीर गुलाल म्हणून राममंदिरांत उधळण करण्यात आली. नाशिक शहरातील सर्व राहाडीचे अर्थात जमिनीतील हौदाचे मानकऱ्यांच्या हस्ते पूजन करुन रंगपंचमीच्या उत्सवाला प्रारंभ झाला. तुळजापूरातही काल रंगपंचमी उत्साहात साजरी झाली. श्रीतुळजाभवानी मंदिरात श्री तुळजाभवानी देवीच्या मुर्तीवर रंगाची उधळण करीत पारंपरिक पध्दतीने रंगपंचमी सण साजरा करण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र मढी इथं चैतन्य कानिफनाथ संजीवन समाधी

मंदिरात रंगपंचमीनिमित्त लाखो भाविकांनी कानिफनाथांचे दर्शन घेतलं. सोलापूर शहर तसंच जिल्ह्यातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर युवक काँग्रेसच्या वतीनं काल पाण्याचा अपव्यय टाळण्यात आला आणि कोरडी रंगपंचमी साजरी करण्यात आली.

**<u>वसुली-जळगाव</u>**

जळगाव जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचायती आणि महपालिकेच्या मालमत्ता कर आणि पाणीपट्टीची मागील वर्षाच्या तुलनेत यंदा चार पटीहून अधिक वसुली झाली आहे. मागील वर्षी एकंदर वसुली 14 कोटी होती, यावर्षी 58 कोटी रुपये वसुली झाली आहे.

**<u>विमान-नांदेड</u>**

नांदेड विमानतळावर आजपासून नांदेड - बंगळुरू, नांदेड - दिल्ली - जालंधर ही विमानसेवा दररोज तर नांदेड - हैदराबाद आणि नांदेड - अहमदाबाद ही विमानसेवा आठवड्यातून चार दिवस सुरू राहणार आहे. नांदेडसह परभणी, हिंगोली, लातूर, बीड, धाराशिव आदी जिल्ह्यातील प्रवाशांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे.

**<u>तापमान</u>**

गेल्या सुमारे आठ दिवसांपासून पुण्यातील रात्रीच्या तापमानात मोठी वाढ झाल्यामुळं पुणेकरांची रात्रीची झोप उडाली आहे. शिवाजी नगर भागात सर्वाधिक तापमान वाढ नोंदवली गेली आहे तर कोरेगाव पार्क, वडगाव शेरी भागातही रात्रीच्या तापमानात चांगलीच वाढ दिसून आली आहे. दिवसा ढगाळ हवामानामुळं दमटपणा वाढत चालला आहे. चैत्र पालवीच्या निमित्तानं दरवर्षी पुण्यात दिसणारी रम्य, सुखद गारवा पसरवणारी सायंकाळ यंदा मात्र लुप्त झाल्याचं चित्र आहे.

**<u>पाऊस</u>**

सातारा शहर आणि परिसरात काल दुपारी पावसानं हजेरी लावली. बुलढाणा जिल्ह्यात शुक्रवारी मध्यरात्रीनंतर पडलेल्या पावसामुळे सिंदखेडराजा तालुक्यात साखरखेर्डा इथं वीज पडून अनेक घरांना तडे गेले. तर जामोद परिसरामध्ये कांदा पिकासह भाजीपाल्याचं मोठं नुकसान झालं आहे. बीड जिल्ह्यात काल संध्याकाळी पावसानं हजेरी लावली. आष्टी तालुक्यातील हनुमंतगाव इथं वीज अंगावर पडून एका महिलेचा मृत्यू झाला. हिंगोली जिल्ह्यात काल संध्याकाळी वादळी वाऱ्यांसह पाऊस पडल्यामुळं उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. हळद उत्पादक शेतकऱ्यांना मात्र या पावसाचा मोठा फटका बसला शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. भंडारा जिल्ह्यात काल संध्याकाळपासून दमदार पावसाला सुरवात झाली. भाजीपाला पिकासह शेतपिकांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे तर या पावसामुळे उन्हाळी धानपिकाला लाभ होणार आहे.

**<u>हवामान</u>**

सर्वाधिक कमाल तापमान काल परभणी इथंच 41 पूर्णांक 6 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात रात्रीच्या वेळी अधिक उष्मा राहण्याचा आणि विदर्भात वीजा, जोराचे वारे यांच्यासह तुरळक ठिकाणी पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
# नमस्कार.